# केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी योजना लक्षित लाभार्थ्यापर्यंत पोहोचवा-कुणाल कुमार



**गोंदिया :** केंद्र सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचा लाभ लक्षित लाभार्थ्यापर्यंत वेळेत पोहोचावेत याची खात्री करण्याच्या उद्देशाने "विकसित भारत संकल्प यात्रा" नावाची देशव्यापी मोहिम केंद्र शासनाकडून आखण्यात आली असून १५ नोव्हेंबर २०२३ ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत देशभरात चित्ररथाच्या माध्यमातून योजनांची जनजागृती करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या मोहिमेच्या माध्यमातून महत्वाकांक्षी योजना लक्षित लाभार्थ्यापर्यंत पोहोचवाव्या अशा सूचना सह सचिव तथा मिशन संचालक स्मार्ट सिटी मिशन कुणाल कुमार यांनी केल्या. कुणाल कुमार हे "विकसित भारत संकल्प यात्रा" मोहिमेचे गोंदिया व गडचिरोली जिल्हा प्रभारी आहेत. या मोहिमेत केंद्र व राज्य सरकारच्या सर्व विभागांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात गोंदिया जिल्ह्यात "विकसित भारत संकल्प यात्रा" चित्ररथाच्या माध्यमातून ५४७ ग्राम पंचायतीमध्ये फ्लॅगशिप योजनांची माहिती लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्याचे नियोजित आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील व सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. कुणाल कुमार यांनी या मोहिमेची सविस्तर माहिती व रूपरेषा समजावून सांगितली. शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात हा चित्ररथ फिरविण्यात येणार आहे.

शहरी भागासाठीच्या १७ व ग्रामीण भागाच्या १७ अशा एकूण ३४ फ्लॅगशिप (महत्वाकांक्षी) योजनांची सचित्र माहिती या चित्ररथावर फ्लेक्स स्वरुपात अंकीत केलेली असेल. त्याच सोबत योजनांची माहिती असलेले मुद्रित साहित्य सुद्धा देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी "विकसित भारत संकल्प यात्रा" जाईल त्या गावात आरोग्य शिबिर घेण्यात यावे असेही त्यांनी सांगितले. या मोहिमेचे जिल्हास्तरीय नोडल अधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी जबाबदारी सांभाळणार आहेत.

"विकसित भारत संकल्प यात्रा" मोहिमेसाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मोहीमपूर्व प्रसार प्रसिद्धी करण्यात यावी अशा सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणेला केल्या. ही मोहिम यशस्वीरीत्या राबविण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची तालुका प्रभारी व गाव प्रभारी (नोडल अधिकारी) म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. गावात येणाऱ्या चित्ररथाच्या आयोजनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात येणार आहे. प्रामुख्याने हे ग्रामस्तरीय कर्मचारी असणार आहेत.


चित्ररथासोबतच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत असे सांगून कुमार म्हणाले की, यासाठी स्थानिक महिला बचतगटांचे सहकार्य घेण्यात यावे. गावात होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती, छायाचित्र व व्हिडीओ, लाभार्थ्यांचे मनोगत, व्हिडीओ बाईट, फीडबॅक केंद्र सरकारने विकसित केलेल्या आयटी पोर्टलवर त्याचक्षणी अपलोड करण्यात यावेत असे श्री. कुमार म्हणाले. केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती देणाऱ्या या मोहिमेत नागरिकांनी व लाभार्थ्यांनी सहभागी होऊन माहिती घ्यावी तसेच आपला फीडबॅक कळवावा असे आवाहन कुणाल कुमार, जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले आहे.

योजना ग्रामीण भाग-आयुष्मान भारत, पीएम गरीब कल्याण अन्न योजना, दीनदयाल अंत्योदय योजना, पीएम आवास योजना ग्रामीण, पीएम उज्वला योजना, पीएम विश्वकर्मा योजना, किसान क्रेडिट कार्ड, पीएम किसान सन्मान योजना, पीएम पोषण अभियान, हर घर जल जल जीवन मिशन, स्वामित्र योजना, जनधन योजना, जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, पीएम प्रणाम योजना व नमो फर्टिलायझर योजना.

योजना शहरी भाग-पीएम स्वनिधी, पीएम उज्वला योजना, पीएम विश्वकर्मा योजना, मुद्रा लोन योजना, स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया, आयुष्मान भारत, पीएम आवास योजना शहरी, स्वच्छ भारत अभियान, पीएम ई-बस सेवा, अमृत योजना, भारतीय जन औषधी परियोजना, उजाला योजना, सौभाग्य योजना, डिजिटल पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चर, खेलो इंडिया, उडान व वंदे भारत ट्रेन आणि अमृत भारत स्टेशन योजना, या योजना केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी योजना आहेत.

# कुठल्याही अटी शर्ती शिवाय सुरु करा धान खरेदी-खा.प्रफुल पटेल





**जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाने कुठल्याही आडकाठी विना त्वरित शासकीय धान खरेदीला सुरुवात करावी. धान खरेदी संस्था आणि शेतक?यांना कुठलीही अडचण होणार नाही याची सुध्दा काळजी घ्यावी.**

**- प्रफुल्ल पटेल, खासदार**

**गोंदिया :** शासनाने शासकीय धान खरेदी संस्थाना धान खरेदी करण्यासाठी कुठल्याही अटी शर्ती न लावता जुन्याच निकषानुसार त्वरित धान खरेदी सुरु करावी, दिवाळीपुर्वी धान खरेदीला सुरुवात होणे अपेक्षित असताना अद्यापही धान खरेदी सुरु झालेली नाही. यावर खा. प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी (दि.१०) तीव्र नाराजी व्यक्त करीत मार्केटिंग फेडरेशनचे महाव्यवस्थापक श्री धपाटे यांना त्वरित धान खरेदी सुरु करण्यास सांगितले.

शासकीय धान खरेदी केंद्रावर धान खरेदीसाठी शासनाने यावषी नवीन निकष लावले होते. त्यामुळे धान खरेदी संस्थानी धान खरेदी न करण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यान याप्रकरणी खा. प्रफुल्ल पटेल यांनी लक्ष घालून राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर १ नोव्हेंबरला या विषयावर मुंबई मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत जुन्याच निकषानुसार धान खरेदी करण्याचा निर्णय घेतला.

यासंबंधिचा जीआर देखील काढण्यात आला. पण गुरुवारी (दि.९) शासनाने धान खरेदी केंद्र सुरु करण्याचे आदेश काढले. पण त्यात धान खरेदी संस्थाना पाचशे रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर शपथपत्र तसेच केंद्रावर विक्री करणा?या शेतकऱ्यांची जातीचा उल्लेख व संस्थांना काही अटी शर्थी लागू केल्या आहे. त्यामुळे धान खरेदी संस्थांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. दरम्यान ही बाब माजी आ. राजेंद्र जैन यांनी खा. प्रफुल्ल पटेल यांच्या लक्षात आणून दिली. तेव्हा खा. प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी (दि.१०) सकाळी मार्केटिंग फेडरेशनचे महासंचालक श्री धपाटे यांच्याशी फोनवरुन चर्चा केली. तसेच धान खरेदी सुरु करण्याच्या आदेशातील संपूर्ण अटी शर्थी रद्द करुन जुन्याच निकषानुसार धान खरेदी त्वरित सुरु करण्यास सांगितले. यावर महाव्यवस्थापक धपाटे यांनी लावल्या अटी शर्थी रद्द करुन खरेदीला सुरुवात करण्याचे आश्वासन दिले.

# रतनारा येथील एकमेव गणित शिक्षकाची बदली करुन विद्यार्थ्यांचे राऊत यांनी केले नुकसान

**गोंदिया:-** गोंदिया पंचायत समितीतंर्गत येत असलेल्या शिक्षण विभागाचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी राऊत यांनी आपल्या पदाचा गैरवापर करण्यास सुरवात केले असून प्रतिनियुक्तीच्या नावावर शिक्षकांच्या नियमबाह्य बदल्यांचा खेळ सुरु केला आहे. राऊत यांनी सुरु केलेल्या या नियमबाह्य शिक्षकांच्या बदल्यांच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन त्यांचा प्रभार काढून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी रतनारा येथील माजी सरपंच व विद्यमान उपसरपंच धनपाल धुवारे व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजकुमार बिजेवार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुध्दा या तक्रार अर्जावर गांभीर्याने लक्ष देण्याऐवजी दुर्लक्ष केल्याने जिल्हा परिषदेच्या कारभारावरच शंका निर्माण होऊ लागल्या आहेत.

सविस्तर असे की जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा रतनारा येथे इयत्ता १ ते ८ पर्यंतचे वर्ग असून ४७२ विद्यार्थी संख्या आहे.१ ते ५ विद्यार्थी संख्या ३०३ व ६ ते ८ ची विद्याथी संख्या १६९ आहे. ६ ते ८ मध्ये २ गणित शिक्षक,२ भाषा शिक्षक व १ सामाजिक शास्त्र असे एकूण ५ पद मंजूर आहेत.२ गणित शिक्षकाचे मंजूर पदापैकी १ पद १२ सप्टेंबर २३ पर्यंत भरलेले होते. गणित शिक्षक आय.ए.घरसेले विषय हे शिक्षक गणित अध्यापनाचे कार्य करीत असतानाच प्रभारी गटशिक्षणाधिकारी राऊत यांनी दि.११/०९/२०२३ च्या आदेशान्वये रतनारा शाळेतून हटवून त्यांना भानपूर केंद्रातील फत्तेपूर शाळेत शैक्षणिक कार्यासाठी बदली आदेश देत रतनारा येथील एकमेव गणित शिक्षकही हिरावून घेतला.जेव्हा की गणित व विज्ञान विषयाचे शिक्षकाचे स्थानांतरण करतांना विषयाला प्राधान्य देण्यात येते. जेव्हा की सदर शिक्षकाची कुठलीही तक्रार नसताना ग्रा.पं.सरपंच व पं.स.सभापती यांच्या पत्रान्वये बदली केल्याचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सांगत असले तर त्यांनी घरसेले यांच्याबद्दल आलेल्या तक्रारीची चौकशी का केली नाही अशा प्रश्न उपस्थित केला करीता राऊत यांनी राजकीय दबावात विद्यार्थ्यांचे नुकसान केल्याने त्यांची सखोल चौकशी करुन त्यांचे पदभार काढण्यात यावे असे धुवारे यांनी म्हटले आहे.

गट शिक्षणाधिकारी म्हणून राऊत यांनी चौकशी केलेली नाही, चौकशी केल्यानंतर ते दोषी आढळले असते तर योग्य ती कारवाई करायला हवी होती, परंतु अशाप्रकारे कुठलीच कारवाई न करता राजकीय दबावात संगणमत करुन बदलीची कारवाई करण्यात आल्याने गोंदिया पंचायत समिती अंतर्गत या शैक्षणिक वर्षात झालेल्या सर्वच प्रतिनियुक्त्यासंह राऊत यांच्या कार्यकाळातील कामाची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी मुकाअ यांच्याकडे धुवारे व बिजेवार यांनी केली आहे.राऊत यांनी सभापतींना सोबत घेत ३०-३५ शिक्षकांच्या केलेल्या नियमबाह्य बदल्यांची सखोल चौकशी शिक्षण सभापती कधी करणार अशा प्रश्न उपस्थित करीत शिक्षकाच्या आनलाईन बदल्यांची गरजच काय असेही तक्रारीत म्हटले आहे.

शाळेत जर दुसरा गणित विषयाचा शिक्षक नसेल तर शिक्षकाची बदली करता येत नाही असे असताना सुद्धा राऊत यांनी खोट्या तक्रारीच्या आधारावर बदली केली. तेव्हापासून आजपर्यंत रतनारा येथील शाळेत गणित विषयाची एकही तासिका न झाल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान प्रभारी शिक्षणाधिकारी व पंचायत समिती सभापतींनी केल्याने विद्यार्थ्यांना गणिताच्या अध्यापासून मुकण्याची वेळ आली आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्वरीत याकडे लक्ष न दिल्यास गावकरी व पालक आंदोलनाचा मार्ग स्विकारतील अशा इशारा तक्रारीतून दिला आहे.

# विद्युत प्रीपेड स्मार्ट मीटर लावण्याचा निर्णय मागे घ्या

## विदर्भ राज्य आंदोलन समितिचे राज्य शासनाला निवेदन



**गोंदिया:-** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित द्वारे विदर्भात प्रीपेड स्मार्ट मीटर दिवाळी नंतर लावण्याकरीता युद्धपातळीवर कार्यवाही सुरु आहे. नागरिकांची मागणी नसताना, तसेच गरज नसताना, जनतेला विश्वासात न घेता विद्युत प्रीपेड स्मार्ट मीटर लावण्याची कार्यवाही महाराष्ट्र शासनाने सुरु केलेली आहे.

शासनाच्या या चुकीच्या निर्णयाचा विरोध करून गोंदिया जिल्हा विदर्भ राज्य आंदोलन समिति तर्फे सदर निर्णय मागे घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व नियोजन वित्तमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले.

या प्रसंगी विदर्भ राज्य आंदोलन समिति जिल्हा समन्वयक अतुल सतदेवे, जिल्हा प्रचार प्रमुख वसंत गवळी, उपाध्यक्ष भोजराज ठाकरे, महिला आघाडी प्रमुख दीपा काशीवार, अजय गौर, किशोर साहू, रमेशराव ब्राम्हणकर, कैलाश भेलावे, भुमेंश्वर शेंडे व अन्य विदर्भवादी कार्यकर्ते उपस्थित होते.


# कार्यालय ग्राम पंचायत चापटी

## पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा परिषद गोंदिया

## निविदा सुचना

सर्व इच्छुक कंत्राटदाराला सुचित करण्यात येत आहे कि, ग्राम पंचायत बाराभाटीला खालील विवरण पत्राप्रमाणे संपूर्ण कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर कामाकरिता बांधकाम विभागाकडे तथा योग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून मोहरबंद लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अनु.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजापत्रकीय रक्कम | निविदा फार्म ची किंमत | अनामत रक्कम (१%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | विहिर प्लेटफॉर्म दुरुस्ती करणे | १५००००/- | ५००/- | १५००/- | ३ महिने |
| २ | हातपंप ओटे बांधकाम करणे | ६००००/- | ५००/- | ६००/- | ३ महिने |
| ३ | ग्राम पंचायत व अंगणवाडीला पाटी टाकी व पाईप लाईन ची व्यवस्था करणे | १२४६८९/- | ५००/- | १२५०/- | ३ महिने |

१) वरील कामाचे निविदा फॉर्म दिनांक १५/११/२०२३ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि. २२/११/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालय/चापटी येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर पावती मिळेल. २) सदर निविदा मोहरबंब लिफाफ्यात आवश्यक त्या कागद पत्रासह दिनांक १५/११/२०२३ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि. २२/११/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालयात स्विकारण्यात येईल, तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेलु. ३) मोहरबंद निविदा लगतच्या मासिक सभेत ग्राम पंचायत चापटी येथे उघडण्यात येईल. ४) सदर कामाचा तपशीलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहे.

**सरपंच**
ग्राम पंचायत चापटी

**ग्रामसेवक**
ग्राम पंचायत चापटी


# अपारंपरिक ऊर्जा निर्मितीत राज्य अग्रेसर



### राज्यनिहाय कुसुम योजनेची सद्यस्थिती

| राज्य | एकुण मंजूर | स्थापित सौर पंप |
|---|---|---|
| महाराष्ट्र | २,२५,००० | ७१,९५८ |
| हरियाणा | २,५२,६५५ | ६४,९१९ |
| राजस्थान | १,९८,८८४ | ५९,७३२ |
| उत्तरप्रदेश | ६६, ८४२ | ३१, ७५२ |

**मुंबई:-** शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषण विरहित सौर कृषी पंप उपलब्ध करुन देण्यासाठी पीएम कुसुम योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली असून आजपर्यंत ७१ हजार ९५८ सौर पंप स्थापित केले आहे.

केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय "किसान ऊर्जा सुरक्षा व उत्थान महाभियान' म्हणजेच "कुसुम' ही योजना २०१९ ते २०२३ या कालावधीसाठी राबवित आहे. या योजनेत राज्यांना ९ लक्ष ४६ हजार ४७१ सौरपंप बसविण्यासाठी मान्यता दिली आहे. देशात यापैकी एकूण २ लक्ष ७२ हजार ९१६ सौर पंप स्थापित झाले आहेत. यामध्ये सर्वात जास्त सौर कृषिपंप महाराष्ट्रामध्ये महाऊर्जामार्फत बसविण्यात आले आहेत.

पीएम कुसुम योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाऊर्जामार्फत स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज करण्यापासून कागदपत्रे अपलोड करणे, छाननी करणे, शेतकऱ्यांना लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी एसएमएस पाठविणे, लाभार्थी हिस्सा ऑनलाइन भरण्याची सुविधा देणे, पुरवठादार निवडण्याचे शेतकऱ्यांना मुभा देण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी पुरवठादार निवडल्यानंतर सौर पंप स्थापित करून त्याची आरएमएस प्रणालीद्वारे माहिती घेतली जाते.

नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने महाराष्ट्रातील महाऊर्जास एकूण २ लक्ष २५ हजार सौर पंप आस्थापनेस मान्यता दिली आहे. यापैकी राज्य शासनाने महावितरण कंपनीस त्यांच्याकडील पेड पेंडींगच्या पुढील १ लक्ष सौर पंप आस्थापनेसाठी मान्यता दिली आहे. त्यामुळे महावितरणकडे कृषिपंप जोडणीसाठी अर्ज केलेल्या मात्र अनामत रक्कम न भरलेल्या शेतकऱ्यांना आता सौर कृषिपंप देण्यात येणार आहे. महाऊर्जाकडे उर्वरित १ लक्ष २५ हजार सौर पंपाचे उद्दिष्टास अनुसरून राज्यात शेतकऱ्यांकडून ८ लक्ष ७४ हजार ९७ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १ लक्ष ४ हजार ८२३ जणांना मान्यता (डजअ) देण्यात आली आहे. त्यापैकी ९४ हजार ९१९ जणांना एसएमएस पाठविण्यात आले आहे. ८३ हजार ४८० शेतकऱ्यांनी लाभार्थी हिस्सा भरला असून त्यातील ७१ हजार ९५८ सौर पंप स्थापित झाले आहेत. त्यामुळे महाऊर्जाने ११ सप्टेंबर रोजी केंद्र शासनाकडे पुढील १ लक्ष ८० हजार सौरपंपाचे अधिक उद्दिष्टाची मागणीदेखील केली आहे.

**सौरपंपासाठी अनुदान**

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदान देण्यात येत असुन यात सर्वसाधारण घटकासाठी केंद्र ३० टक्के, राज्य १० टक्के, लाभार्थी १० टक्के तर टोसे ५० टक्के हिस्सा आहे. तर अनुसुचीत जाती आणि जमातीसाठी लाभार्थी हिस्सा ५ टक्के आहे, केंद्र ३० टक्के तर राज्य ६५ टक्के हिस्सा देईल.

यासोबतच राज्य शासनाने स्वतःचे अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण २०२० तयार केले असून मंत्रिमंडळाने त्यास मान्यता दिली आहे. १२ मे २०२१ रोजीच्या निर्णयान्वये शासनाने राज्यात पुढील पाच वर्षात पाच लक्ष सौर कृषिपंप स्थापित करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे केंद्राच्या योजनेसोबतच राज्यही जास्तीत जास्त प्रमाणात सौर ऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी प्रोत्साहन देत आहे.




# आश्रमशाळेत विद्यार्थिनीशी अश्लील चाळे करणाऱ्या मुख्याध्यापकाला अटक, २१ पर्यंत न्यायालयीन कोठडी



**गोंदिया** : सडक/अर्जुनी तालुक्यातील आश्रम शाळेमध्ये एका विध्यार्थिनीशी अश्लील चाळे करणाऱ्या मुख्याध्यापकावर अखेर गुन्हा दाखल करीत तपासानंतर त्यांना अटक करून त्यांची भंडारा जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

सविस्तर वृत्त असे की, गोंदिया जिल्ह्याच्या सडक अर्जुनी तालुक्यातील ग्राम कोकणा जमी. येथील श्रीकृष्ण अवधूत आदिवासी आश्रम शाळेमध्ये कार्यरत असलेले मुख्याध्यापक केदार मार्तंड गहाणे (वय ४७ वर्ष) रहिवासी कोल्हारगाव यांच्यावर गंभीर स्वरुपाचा गुन्हा सडक अर्जुनी तालुक्यातील डूग्गीपार पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला आहे. आश्रम शाळेत शिक्षण घेत असलेल्या एका विध्यार्थिनीशी त्यांनी अश्लील चाळे केले आहे. एकंदरीत ही घटना संपूर्ण शिक्षण विभागाला लाजवणारी आहे. काही दिवसांपूर्वी आश्रमशाळेच्या एका विध्यार्थिनीबरोबर त्यांचा एक छायाचित्र समाज माध्यमावर प्रसारीत झाला होता. त्या अनुषंगाने प्राप्त माहिती मिळाल्यानंतर शाळा प्रशासनाने त्यांना निलंबितदेखील केले होते. तर तालुक्यातील आदिवासी संघटनेचे पदाधिकारीदेखील त्या ठिकाणी शाळेच्या मुख्याध्यापकाला जाब विचारण्यासाठी गेले होते. या संघटनेच्या मदतीने अखेर पीडित मुलीच्या तक्रारीवरून डूग्गीपार पोलीस स्टेशन येथे मुख्याध्यापक केदार मार्तंड गहाणे यांच्या विरोधात ३५४ ए, ३५४ डी, ५०६ तसेच पोक्सो कलम १०, १२ आणि अनुसूचित जाती जमाती कायदा (अॅट्रॉसिटी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला डूग्गीपार पोलिसांनी अटक केली आहे. घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर करत आहेत.


पीडित मुलगी ही श्रीकृष्ण आदिवासी आश्रम शाळा कोकणा जमी तालुका सडक अर्जुनी येथे शिकत आहे. तक्रारदार विध्यार्थिनीने पोलिसांना सांगितले की, आरोपी मला ऑफिसमध्ये बोलावून रजिस्टर लिहिण्याच्या बाहण्याने पायाला पाय लावून वाईट उद्देशाने स्पर्श करत होता. त्यांनी नियमित हा क्रम सुरू ठेवला होता. तक्रारीवरून डूग्गीपार पोलीस स्टेशन येथे विविध कलमांअंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तसेच आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. त्यामुळे या आश्रमशाळेत पालक आपले मुलंमुली शिकवणार का हा प्रश्न आता निर्माण झाला आहे.विध्यार्थिनीने पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीची शहानिशा करून आरोपी शिक्षकाला अटक करण्यात आली व न्यायालयात हजर केले असता २१ नोव्हेंबरपर्यंत त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

# परदेशी पाहुण्यांचे आगमन! स्थलांतरित पक्ष्यांच्या ५० हून अधिक प्रजातींचा चार महिने मुक्काम

**गोंदिया:** तलावांचा जिल्हा म्हणून गोंदिया जिल्ह्याची सर्वदूर ओळख आहे. सध्या वाढत्या थंडीमुळे येथे स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन सुरू झाले आहे. त्यामुळे पक्षीप्रेमींचा उत्साह आणि धरणे व तलावांचे सौंदर्य वाढू लागले आहे. अनुकूल वातावरण आणि हवे असलेल्या अन्नाची उपलब्धता लक्षात घेऊन हे पक्षी प्रवास करीत असतात.

स्थलांतरित पक्षी हजारो किलोमीटर अंतर कापून नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात येथे येतात, तर वसंत पंचमीपासून त्यांचा परतीचा प्रवास सुरू होतो. येथे येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांमध्ये ग्रेलॉक गुग्ज, कॉमन पोचार्ड, रेड क्रेस्टेड पोचाई, मलाई, गर्गनी, आर्क्टिक टर्न, सायबेरियन स्टॉर्क, ब्लॅक-टेलेड गॉडविट, कॉमन डिल, सायबेरियन क्रेन, नॉर्दर्न पिनटेल, ओपन बिल स्टॉर्क ब्लॅक हेड, ब्लॅक हेड एम्बिस, पांढरा स्तन, पट्टे स्टार्क, कामीरंट, पॅरामपल मोर्हेन, वॉटरहेन, राखाडी बगळा, कमी पंख असलेला गरुड यांचा समावेश असतो. वनांनी वेढलेल्या तलावात बहुतांश पक्षी दिसतात.


नवेगावबांध, नागझिरा, चुलबंद प्रकल्प, पुजारीटोला, बाजारटोला, परसवाडा, झिलमिली, आमगावचा नवतलाब, महादेव टेकडी परिसर, झालिया तलाव आणि अंजोरा तलाव येथे परदेशी पक्ष्यांचा मुक्काम असतो. गेल्या काही दिवसांपासून परदेशी पक्ष्यांवर शिका-यांची वक्रदृष्टी पडली आहे. यावर वनविभाग आणि वन्यजीव विभागाकडून ठोस उपाययोजना आणि कसोशीचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.



तलावातील प्रदूषण आणि शिकारीची समस्या

परदेशी पक्ष्यांचे संरक्षण आणि त्यांचा वावर असलेल्या तलावांच्या स्वच्छतेच्या नावावर वारेमाप पैसा खर्च केला जातो. मात्र, प्रदूषण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे, तर शिकारींच्या घटनांमध्येही झपाट्याने वाढ होत आहे. परिणामी स्थलांतरित पक्ष्यांच्या संख्येत घट दिसून येत आहे. तलाव संकुलात राहणाऱ्या नागरिकांनीही पक्ष्यांच्या संरक्षणासाठी सहकार्य करावे, जेणेकरून भक्षकांसह प्रदूषण होणार नाही, असे आवाहन पक्षी मित्र व मानद वन्यजीव सदस्य मुकुंद धुर्वे यांनी केले आहे.













### भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्षपदी महेंद्र निंबार्ते यांची नियुक्ती

भंडारा-भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी महेंद्र निंबार्ते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई येथे झालेल्या ओबीसी मोर्चाच्या बैठकीत हे नियुक्तीपत्र ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी महेंद्र निंबार्ते यांना दिले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते म्हणून महेंद्र निंबार्ते यांनी काम केले. २००५ ते २०१६ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य तसेच व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. या काळात विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावले. राजकीय जीवनाची सुरुवात भंडारा नगरपरिषदेचे नगरसेवक म्हणून झाली. भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष, जिल्हा सचिव, जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या.

दरम्यान मुंबई येथे झालेल्या भाजपा ओबीसी मोर्चाच्या बैठकीत त्यांच्यावर ओबीसी मोर्चा प्रदेशाचे उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. हे नियुक्तीपत्र प्रदेशाचे अध्यक्ष संजय गाते यांनी त्यांना दिले. पक्षाने टाकलेला विश्वास सार्थकी ठरविण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करू असे महेंद्र निंबाते यांनी सांगितले.

### गाडीला कट मारल्याच्या वादातून एकाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या

**गोंदिया**: १३ नोव्हेंबर : दिवाळीच्या दिवशीच गोंदिया शहरात मध्यरात्री हत्येचा थरार घडला. एका २३ वर्षीय युवकाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. आरोपी अज्ञात असून त्याचा शोध सुरू आहे.गाडीला कट मारल्याच्या वादातून ही हत्या झाल्याचे समोर आले आहे. अर्पित उर्फ बाबू ऊके वय (२३) असे मृतकाचे नाव असुन तो गोंदियातील आंबाटोली येथील आहे.मृतक व आरोपी यांच्यात गाडीला कट मारल्यावरून वाद झाला. ही घटना मध्यरात्री घडली.







